# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०१/०७/२०१८
## दि.३०/०६/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे १२०/१८,भादविक ३०७,१४३,१४७,१४८,१४९,५०४ |
| **फिर्यादी** | शाहिद घोडके,वय-२२,रा.भवानी पेठ,पुणे |
| **आरोपी** | चार पुरूष व पाच महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०६/२०१८ रोजी २१/०० वा. अमर घोडके यांचे घरासमोर ९३१,भवानी पेठ,मार्केटयार्ड, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद चार पुरूष व पाच महिला यांनी जुन्या भांडणाचा राग मनात धरून,त्यापैकी महिलांनी फिर्यादीस पकडुन शिवीगाळ करून,त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून रेहमान याने फिर्यादी यांचे डोक्यात धारधार कोयत्याने जीवे ठार मारण्याचे उद्देशाने वार करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एन.एन.अतकरे ८८०५०२३१९३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १७९/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४१ वर्षे,रा.पौड रोड कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०६/२०१८ रोजी ०६/३० वा. महालक्ष्मी स्नॅक्स सेंटर समोर,कचरा डेपो,पौड रोड कोथरुड,पुणे येथे रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया रिक्षाने त्यांचे राहते घरी जात असताना,नमुद ठिकाणी स्पिडबेकरवर रिक्षाचा वेग कमी झाली असता,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून फिर्यादी यांचे रिक्षाचे डावे बाजुने त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचेजवळील पर्स जबरदस्तीने हिसकावुन पर्स मधील मोबाईल,रोख रक्कम व महत्वाची कागदपत्रे असा एकुण २०,०५०/- रु किचा ऐवज चोरुन नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जर्दे ९८५००७७३६० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे १४५/१८,भादविक ४२०,४६५,४६७,४६८,४७१,३४ |
| **फिर्यादी** | एक परूष,वय-४४,रा.नेपियर रोड,पुणे |
| **आरोपी** | एक पुरूष व दोन महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०१६ ते दि.३०/०३/२०१६ तसेच दि.१७/०६/२०१६ रोजी मा.दिवाणी न्यायालय शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे एज्युकेशन ग्रुपचे विरूध्द स्पेसिफिक परफॉर्मन्सचे दाखल दाव्या मध्ये यातील नमुद इसम व महिला यांनी फिर्यादी यांचे खोटे वकीलपत्र तसेच खोटे ॲफेडेव्हिट तयार करून,त्यावर फिर्यादी यांची खोटी सही करून,नोटरी नोंद करून फिर्यादी यांची फसवणुक करण्याचे व एकतर्फी न्यायालयीन आदेश प्राप्त कररण्याचे उद्देशाने मा. दिवाणी न्यायालयाची दिशाभुल करून फिर्यादी यांचे परस्पर दाखल केलेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. बी.एस.डोईफोडे ९९२२४५९२३७ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १६८/१८,भादविक ४२०,४६५,४६८,४७१ |
| **फिर्यादी** | अभिजित भोसले,वय-४८ वर्ष,रा.येरवडा,पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपी** | १.एक विद्यार्थी,वय-२० वर्ष,रा.पिंपळे-गुरव,पुणे २.एक विद्यार्थीनी,वय-१९ वर्ष,रा.नाना पेठ,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०१/२०१७ रोजी ऑल इंडिया श्री.शिवाजी मेमोरियल सोसा.अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे कॉलेज मध्ये इंजिनिअरिंगच्या कॉम्प्युटर इंजिनिअरिंग इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग मॅकॅनिकल इंजिनिअरिंग हे अभ्यासक्रम शिकवले जातात. सदर अभ्यासक्रमासाठी फिर्यादी यांचे कॉलेज मध्ये प्रवेश घेण्यासठी शासनाने निर्गमित केलेल्या नियमानुसार केंद्रिय प्रवेश प्रक्रियेद्वारे विदयार्थ्यांना प्रवेश दिला जातो. विदयार्थ्यास प्रवेश अलॉट झाल्यानंतर व विदयार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर तंत्र शिखण संचालनालयाने विहित केलेल्या नियमानुसार सदर विदयार्थ्यांचे मुळ कागदपत्रे तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,पुणे यांनी आदेश दिल्याप्रमाणे जात वैध्यता प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे येथे पडताळणी केली जातात. शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ साठी यातील नमुद एक पुरूष विद्यार्थी व महिला विद्यार्थीनी यांनी स्पेशल क्लास या सत्रासाठी प्रवेश घेतेवेळी,त्यांनी त्यांची शिक्षणाची सर्व मुळ कागदपत्रे फिर्यादी यांचे ऑल इंडिया श्री.शिवाजी मेमोरियल सोसा. अभियांत्रिकी महाविद्यालय केनेडी रोड,आर.टी.ओ.जवळ,पुणे या कॉलेज मध्ये जमा करून, सदर कागदपत्रां मध्ये त्यांनी सादर केंलेली जात वैध्यता प्रमाण पत्र हे पडताळणी कामी फिर्यादी यांचे कॉलेजचे कार्यालयीन जावकानुसार मा.उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समती,पुणे डिव्हीजन कमिटी नं.३,पुणे योचंकडे पडताळणी कामी पाठविण्यात आली होती. सदर जातवैध्यता प्रमाणपत्र प्रमाणपत्राची खातर जमा / शहानिशा करता,नमुद विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा स्पेशल बॅकवर्ड क्लास असे प्रवेश घेतेवेंळी सादर केलेले जात वैध्यता प्रमाणपत्र हे बनावट व बोगस असल्याचे जात पडताळणी कार्यालयाने फिर्यादी यांचे कॉलजेला कळविले आहे. त्यानंतर कॉलेजनी सदरची बाब ही केंद्रिय प्रवेश प्रक्रिया राबवणारे कार्यालय मा.तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,पुणे यांना दोन्ही विदयार्थ्यांवर शासनाची व महाविदयालयाची फसवणुक केल्या प्रकरणी फिर्याद दाखल करावी असा आदेश दिला होता. तरी यातील एक विद्यार्थी यास दिव्तीय वर्ष या सत्रासाठी व एक विद्यार्थीनी हिस प्रथम वर्ष या सत्रासठी प्रवेश घेते वेळी विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गाचे बनावट व बोगस जात वैध्यता प्रमाणपत्र सादर करून शासनाची व महाविद्यालयाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.एन.ढोले ९८२२९०७१०० / ८८८८५३७४५५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**